सकाळ

सिंधुदुर्ग, रविवार,
११ डिसेंबर २०२२



दोडामार्ग : यशस्वी विद्यार्थ्यांना गौरविताना मान्यवर.

# हळबे महाविद्यालयाचे 'पूर्णब्रह्म' स्पर्धेत यश

सकाळ वृत्तसेवा

दोडामार्ग, ता. १० : कुडाळ येथील पाटकर वर्दे हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयात आयोजित केलेल्या 'पूर्णब्रह्म' स्पर्धेत येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

सलग तीन दिवस चालेल्या या स्पर्धेत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १५ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मास्टर शेफ, शेक इट टू मेक इट, टॉवेल आर्ट, मास्टर माईंड, नॅपकीन फोल्ड अशा कला सादर केल्या.

हळबे महाविद्यालयाचा विद्यार्थी पांडुरंग सावंत याला 'शेक इट टू मेक इट'मध्ये द्वितीय, अनिल पाटयेकर व पंकज कांबळे यांना कॅरम स्पर्धेत द्वितीय, तर राखी हळदणकर हिला 'बेक माय डे'मध्ये तृतीय क्रमांक मिळाला.

दरम्यान, या स्पर्धेचे आयोजन केल्यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळाले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांनीही समाधान व्यक्त केले. तसेच दरवर्षी अशी स्पर्धा आयोजित करण्याची मागणी केली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे व हॉटेल मॅनेजमेंट विभाग प्रमुख प्रा. कौशिक शेटये, प्रा. रोहन बागकर, प्रा. अशिता नाईक यांचे नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेट्ये, संस्थेचे सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.